# चुलीपल्याड...

अंक १० वा – डिसेंबर २०१७

**सप्रेम नमस्कार,**

समाजातली वाढती हिंसा ही आपल्या सगळ्यांसाठीच खूप चिंतेची गोष्ट आहे. या पार्श्वभूमीवर हिंसेसंदर्भातल्या काही वेगळ्या घटनांकडे लक्ष वेधावं असं वाटतं. या घटना उमेद वाढवणाऱ्या आहेत.

हरियाणातल्या रेवाडी गावातल्या शाळकरी मुलींनी शाळेच्या रस्त्यावर होणाऱ्या छळवणुकीविरोधात आंदोलन केलं. दिल्ली विद्यापीठातल्या मुलींनी त्यांच्यावर लादल्या जाणाऱ्या बंधनांविरोधात 'पिंजरा तोड' ही चळवळ सुरू केली. जगभरातल्या यशस्वी, मान्यवर स्त्रियांनी स्वत:वर झालेल्या लैंगिक हिंसाचाराबाबत धिटाईनं बोलायला सुरवात केली आणि त्यातून 'मी टू' – 'मी देखील (पीडित)' हा आवाज जाहीरपणे उमटला. हिंसेविरोधात बोललं जाणं. त्याविरुध्द संघटितरीत्या पावलं उचलली जाणं यादृष्टीनं या घटना महत्त्वाच्या आहेत.

तशाच या आणखीन दोन महत्त्वाच्या घटना! एक आहे भोपाळची. क्लासहून घरी जात असताना १९–२० वर्षाच्या मुलीवर काही नराधमांनी सामूहिक बलात्कार केला. तिने मोठ्या धैर्यानं आणि सजगतेनं या प्रसंगाला तोंड दिलंय. ती म्हणते, ''उर्वरित आयुष्य मला 'बिचारी बलात्कारिता' म्हणून जगायचं नाहीये. गुन्हेगारांना शिक्षा व्हायला हवी, कलंक त्यांना लागायला हवा, मला नाही.'' व्यवस्था तिच्या बाजूने नव्हतीच. काहीतरी खोटी फिल्मी तक्रार करतेय असं म्हणून दुर्लक्ष करणारे पोलीस, 'संमतीने आणि इच्छेने घडलेली कृती' असा रिपोर्ट देणारे डॉक्टर या सगळ्यांना जाब विचारायचा, न्यायासाठी लढायचा तिचा निर्धार आहे. यात साधारण स्थिती असणाऱ्या पालकांची साथ तिला आहे. आयएएस व्हायचं तिचं स्वप्न होतं. आता तिला पोलीस ऑफीसर व्हायचं आहे.

दुसरी घटना चंदिगडच्या वर्णिकाची. रात्री गाडीतून जात असताना काही युवक तिचा पाठलाग करतात, तिला पळवून न्यायचा प्रयत्न करतात. ती पोलिसांशी संपर्क साधते. पोलीस तत्परतेने मदतीला येतात. मुलांना पकडतात. ती भाजपच्या नेत्याची मुलं असतात ! धमक्या, हल्ले, दबाव कशाचीही तमा न बाळगता वर्णिका आणि तिचे आयएएस असणारे वडील न्यायासाठी शेवटपर्यंत लढायचं ठरवतात. ते म्हणतात, ''वर्णिकाला ज्या धक्क्यातून, त्रासातून जावं लागलंय ते तर पुसता येणार नाही. मी जर घाबरून गप्प बसलो, तिच्या पाठीशी उभा राहिलो नाही तर बाप म्हणून माझं कर्तव्य पार पाडण्यात मी अपयशी ठरेन. आमच्या सारखे विशेष वर्गातले लोक जर अशा गुन्हेगारांविरुध्द उभे राहिले नाहीत तर भारतातलं कोणीच उभं राहू शकणार नाही.''

या सर्वांना सलाम! अन्यायाविरुध्द लढायचं असं बळ सर्वांना मिळो याच नववर्षाच्या शुभेच्छा !

आपली,
**वंदना**

## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| १. | निवडणुकीच्या रिंगणातून... | २ |
| २. | अन्यायाला प्रतिकार करू या | ६ |
| ३. | सन्मानाने जगायचेय | ७ |
| ४. | पुस्तकपरिचय : आकाश पेलताना | ८ |
| ५. | अविस्मरणीय प्रकाशन–सोहळा | १० |
| ६. | पत्रास कारण की... | ११ |
| ७. | बदल शक्य आहे ! | १२ |
| ८. | लेखनात रमलेल्या माय–लेकी | १३ |
| ९. | तुम्हाला काय वाटतं? | १४ |
| १०. | भय इथले संपत नाही... | १५ |
| ११. | दिशाच्या प्रकाशज्योती | १६ |
| १२. | ॲनिमिया नको ग बाई | १६ |
| १३. | हे चित्र कधी बदलणार? | १७ |
| १४. | सरकार आणि समुदाय यातला पूल | १८ |
| १५. | अखेर काम झाले | १९ |
| १६. | एक स्फूर्तीदायी अनुभव | १९ |

# निवडणुकीच्या रिंगणातून...

**आमची मैत्रीण शकिला चौधरी २०१७ च्या सुरुवातीला झालेल्या पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीला उभी होती. अगदी अचानक ही संधी तिला मिळाली. निवडणुकीला उभं राहायचा हा पहिलावहिला अनुभव होता. त्यातून राजकारण अगदी जवळून पहाता आलं. या राजकारणाचं आणि त्याबरोबरीनं टिपलेल्या समाजबदलाचीही काही निरीक्षणं. तिच्याच शब्दात...**

नमस्कार, मी शकिला याकूब चौधरी हे माझं माहेरकडचं नाव आहे. नवऱ्याचं नाव-राजू अडागळे, मी माहेरकडचेच नाव लावते. माझं शिक्षण एम.कॉम. पर्यंत झालं, पण मी एम. कॉम.च्या एका विषयाचा शेवटचा पेपर दिला नाही. कारण त्याच्या दुसऱ्या दिवशी माझं राजूशी लग्न होतं. स्वतः ठरवलं होतं. मनाने लग्न करायचं होतं. त्या गडबड-गोंधळात तो पेपर राहिला.

आमचा प्रेमविवाह. मी मुस्लीम आणि तो मातंग समाजाचा. त्याच्यामुळे त्याच्याही कुटुंबातून मान्यता नव्हती, आणि अर्थात माझ्याही कुटुंबात मान्यता नव्हती. त्यामुळे आम्ही स्वतःच सत्यशोधक पद्धतीने लग्न करण्याचं ठरवलं आणि केलं. त्यात विद्रोही सांस्कृतिक चळवळीतल्या सहकाऱ्यांनी खूप मदत केली. डॉ. भारत पाटणकर, कष्टकऱ्यांचे नेते यांनी सत्यशोधक पद्धतीने आमचा विवाह लावला. इतरही वेगवेगळ्या संस्थांचे-मान्यवर, कार्यकर्ते उपस्थित होते.

माझ्या कुटुंबातून एकदम टोकाचा विरोध नव्हता. पण हे लग्न त्यांना मान्यही नव्हतं. विरोध म्हणजे खूप वादावादी असं काही नव्हतं. कारण घरी मी कमवती होते. माझ्या लग्नाआधीच वडील वारलेले होते. माझ्यावर दोन भावंडं आणि आईची जबाबदारी होती. राजू दिसायला सुंदर, शिकलेला आणि त्याला चांगल्या ठिकाणी नोकरी. त्याला चांगली स्थळं येत होती. पण तोही सामाजिक चळवळीत काम करत असल्यामुळे त्याचेही विचार वेगळे, जातीय चौकट मोडणारे होते. त्याचवेळी मीही आजूबाजूला बघत होते. माझ्या जमातीमध्ये बहिणींची सातवी झाली की लग्नं झाली होती. त्यांना पाच-पाच मुलं आहेत. नोकरीला बाहेर जायचं नाही इ. बंधनं! मी माझ्या पायावर उभी राहिल्यामुळे तसा खूप विरोध झाला नाही. राजूच्या घरच्यांचा जातीतली मुलगी करावी म्हणून हट्ट होता. पण तो ठाम होता की करायचं तर हिच्याशी लग्न करायचं नाहीतर लग्नच नाही करायचं. तर असं झालं आमचं लग्न. मीही आत्तापर्यंत सामाजिक संस्थांमध्येच काम केलेलं आहे. सध्या मी तथापि संस्थेत काम करत आहे. (मी निवडणुकीला उभी राहिल्यावर ऑफिसमध्ये सगळे खुश होते. मला खूप सर्पोट केला. निवडणुकीच्या दिवशी सगळा स्टाफ माझ्या सोबत होता. वेगवेगळे बुथ सेटअप केले. त्यावर त्यांनी काम केलं.)

### आता निवडणुकीबद्दल

खरं तर डोक्यातच नव्हतं हे राजकारण वगैरे असलं काही. स्वप्नातही विचार नव्हता केला. आमच्या वस्तीमध्ये-यशवंतनगर भागामध्ये एवढ्या वर्षात एकही नगरसेवक झालेला नाही. दर पाचवर्षांनी कुणी ना कुणी वेगवेगळ्या पक्षाचं चिन्ह घेऊन उभं राहतात आणि निवडणुकीत पडतात. या वेळेस एका प्रभागात चार सीट होत्या. त्यामुळे सगळ्यांना उमेदवार

म्हणून ओबीसी महिला हवी होती. शिकलेली आणि दोन पेक्षा जास्त मुलं नसणारी. निवडणुकीची अशी पहिली अट असते ना दोनच मुलं, शिक्षण पाहिजे, जातीचा दाखला पाहिजे. अशी ओबीसी महिला-मुस्लीम ओबीसी भेटलीच नाही. वस्तीतल्या अनेक कार्यकर्त्यांनी शोधाशोध केली. पक्षाचे कार्यकर्ते शोधत होते. त्यावेळेस वस्तीतल्या काही कार्यकर्त्यांनी राजूला विचारलं माझ्याबद्दल. राजूने मला विचारलं की तुला निवडणूक लढवण्यासाठी विचारत होते. तुला उभं रहायचंय का? मी म्हटलं, ''हे काही माझं क्षेत्र नाहीये. निवडणूक वगैरे लढायची नाही.'' आठ दिवसानंतर भाजपवाले आले. सर्वात महत्त्वाचं म्हणजे या भागात येरवड्यामध्ये ६०% मुस्लीम वस्ती आहे. त्यामुळेही लोकांना वाटत होतं की मुस्लीम उमेदवार असेल तर फरक पडेल. एकंदरीत आम्ही दोघंही नवरा-बायको ज्या क्षेत्रातून आलोय, जे शिक्षण घेतलंय. त्यामुळे जात-धर्म मानणारे नाही आहोत. आम्ही दोघंही नास्तिक आहोत. त्यामुळे साधारण एक डोक्यात होतं की ज्या पक्षामध्ये जाती-भेद किंवा स्त्री-पुरुष भेदभाव केला जात नाही, जे पुरोगामी विचारांचे असतील त्यांच्या सोबत आपण जायचं. त्यामुळे मी भाजपला लगेचच नाही म्हटलं. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मला खूप आग्रह केला. मी काँग्रेसला होकार दिला. त्यांनी काम करायला लावलं. म्हणजे वस्त्यांमध्ये मिटींग घेणं वगैरे. त्यांना बघायचं होतं की मी किती लोकांना ओळखते, लोक मला कितपत ओळखतात. त्यांनी एक छोटीशी मिटींग घ्यायला लावली. मी त्या भागातच लहानाची मोठी झालीये, शिक्षण तिथेच झालंय. मी याच भागांमध्ये कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतीचं काम करत होते. त्यामुळे पूर्ण भाग माहीत होता. मी सगळ्यांना माहीत होते. पण ह्या लोकांना बघायचं होतं की, मी ओळखते की नाही लोकांना. तर सहज म्हणत शंभर एक बायकांची मिटींग घ्यावी म्हणून मिटींग लावली. तर तिथे साधारण हजार एक लोक जमले.

त्यांनी ठरवलं तिकिट द्यायचं. पंधरा-दिवस जिथे जिथे माझी ओळख आहे तिथे तिथे ते माझ्या सोबत फिरले. त्यांच्या कुठे कुठे ओळखी आहेत तिथे मला घेऊन गेले.

ऐन वेळेला तिकीट मिळायच्या आदल्या दिवशी मला सांगण्यात आलं की तुला तिकीट नाही मिळणार. (कळलं की, ज्या महिलेला तिकीट मिळालं तिनं तिकीट मिळावं म्हणून १० लाख रुपये मोजले.) मला म्हणाले, ''तू नको उभी राहूस. पुढच्या वेळेस उभी रहा. तू काँग्रेसचंच काम कर. आम्ही तुला मोठं पद देतो.'' मला यासाठीच वाटत होतं की निवडणूक नको. हे काही बरोबर नाही आणि मला हे काही जमणार नाही. आधीपासून बहुजन समाज पार्टीचे लोक, शहराचे अध्यक्ष व इतर पदाधिकारीही मला रोज फोन करात होते, ''तुम्हाला काँग्रेस तिकीट देणार नाही. आमच्या बसपाचे तिकीट आम्ही तुम्हाला देतो. तुम्ही बसपाकडून लढा.'' पण मला असं वाटत होतं की काँग्रेसच्या तिकीटावर आपण निवडून येऊ. ज्या दिवशी तिकीट वितरण होणार होतं त्या दिवशी दुपारपर्यंत मी निवडणुकीचा फॉर्म भरण्याच्या रांगेत उभी होते. पण मला काँग्रेसवाल्यांनी विचारलंच नाही. मग बसपाचे पदाधिकारी आले आणि म्हणाले की आम्ही तिकीट देतो. मग मीही ठरवलं एकदा प्रयत्न करून बघूया. मी त्यांच्यातर्फे उभी राहिले. खरं राजकारण काय असतं ते त्या दिवशी रांगेत उभं राहिल्यावर लक्षात आलं. लोक तुमचं शिक्षण काय झालंय किंवा तुम्ही काय विचाराचे आहात हे बघण्यापेक्षा तुमच्याकडे पैसा किती आहे, तुमच्याकडे माणसं किती आहेत ह्याला जास्त महत्त्व देतात. राजकारणात कधी काय होऊ शकतं ह्याचा काही नियम



नाही. तिकिटाची पळवापळवी कशी चालते हेही मला बघायला मिळालं.

मी उभी राहिले पण पैसा नव्हता. सगळी भिस्त लोकसंपर्कावर. बाकीच्या पक्षांकडे भरपूर पैसे. त्यांचे मोठे मोठे बॅनर्स, रिक्षा, फ्लेक्स आणि सोबत त्यांच्या बरोबर फिरणारी अनेक माणसं.

आमच्याकडे पैसा नाही, लढायचं तर आहे. वाट बघत होतो की पक्षवाले पैसे देतील मग बॅनर करता येईल. पँम्पलेट छापता येईल. लोकांपर्यंत जाता येईल. पण शेवटच्या क्षणापर्यंत त्यांचे पैसे मिळाले नाहीत. फक्त बॅचेस, झेंडे आणि इतर काही साहित्य मिळाले तेवढेच. पण एक केलं तिकीट मिळाल्यापासून ते निवडणुकीच्या दिवसापर्यंत जितकं शक्य असेल तितक्या लोकांना मी प्रत्यक्ष भेटून आले. एकूण ७४, ००० लोकांचा तो प्रभाग आहे. भेटायला, बोलायला गेलं की पहिला प्रश्न 'काय मग किती पैसे देणार? आमच्या घरात एवढी मतं आहेत.' कारण निवडणुकीच्या काळात वस्त्यांमध्ये दारू, जेवण आणि पैसा ह्या तीन गोष्टीच फक्त बघितल्या जातात.

साधारण एका मताला दीड हजार रुपये आणि दोन वेळचं जेवण. रोज प्रचाराला येईल त्या बाईला रोजचे ५०० रुपये आणि दोन वेळंचं जेवण, दोनदा चहा मिळायचा. माझी काही ऐपत नव्हती. मी माझे चार भाऊ, माझे दोन दिर, सासू, मामे सासू, मित्र मंडळी आणि काही कार्यकर्ते. आमच्याकडे एवढीच माणसं होती. आम्ही फिरलो. घरच्यांनी व काही नातेवाईकांनी खूप मदत केली. जवळच्या मित्रांनी थोडी आर्थिक मदतही केली.

मी फक्त एवढंच म्हणत असे की मी निवडणुकीला उभी राहिले आहे. मी तुम्हाला पैसा, दारू, जेवण नाही देऊ शकत, पण निवडून आले तर तुमची कामं करण्याचं आश्वासन मी देते. नगरसेवकानं जी कामं करणं अपेक्षित आहे, ती कामं मी नक्की करेन. पण मी वाट्टेलती आश्वासनं नाही देणार. तुमच्या मुलांना नोकरी लावून देईन, किंवा तुमच्या मुलींच्या लग्नाला मदत करू अशी.

लोक घरात या, बसा म्हणायचे, ''तुम्ही किती पैसे देणार? माझ्या घरात एवढी मत आहेत...'' असं थेट विचारायचे. हे एक होतं. आणि दुसरं असं झालं की मी बसपाकडून लढतेय, मुस्लीम आहे हे तर ठीक होतं. पण आमच्या इथे एआयएम अचानक आलं. हा मुस्लिमांचा पक्ष असा समज. यात निम्मे मुस्लीम उमेदवार. आधीचा नगरसेवकही राष्ट्रवादी काँग्रेसमधून एआयएममध्ये गेला. तो प्रचंड पैसेवाला. सुरुवातीला असं झालं होतं की ज्या ज्या मुस्लीम लोकांना, नातेवाईकांना भेटले ते खूप खूश होते, आपल्या जातीची, आपल्या घरची मुलगी, आपल्या समाजातली महिला उभी राहिली म्हणून.

पण विरोधी पक्षातल्या काही उमेदवारांनी मुस्लीम समाजात जाऊन सांगितलं की, 'ह्या मुलीला मतदान करायचं नाही. ही मुस्लीम असली तरी तिने हिंदू मुलाशी लग्न केलंय. ही जातीच्या बाहेर गेली, आपल्या जातीला बाटवलं, ती जात, धर्म मानत नाही, तिला आपण कसं काय निवडून देऊ शकतो?' त्यांनी असा प्रचार केल्यानंतर आमच्या सोबत असणारे काही नातेवाईक ऐन वेळेला म्हणाले, ''आम्ही प्रचाराला येऊ शकणार नाही. वस्तीत तुझ्या सोबत फिरणार नाही.'' भीती वाटली त्यांना. तिकीट मागे घ्यावे म्हणून माझ्यावर दबाव टाकला. शांत बसण्यासाठी त्यांनी मला मोठ्या रक्कमेची ऑफर दिली. निवडणुकीतून माघार घेण्याची वेळ संपली होती. म्हणून त्यांनी सांगितलं, ''फक्त घरी बसायचं, निवडणुकीच्या दिवशी तिथे येऊन उभं राहायचं, करायचं काही नाही.''

मी ठामपणे सांगितलं, ''मी असं करणार नाही. पैशानंच जर का हे सगळं चालत असतं तर मी ह्याच्यात पडलेच नसते. पैसा हा माझ्यासाठी महत्त्वाचा नाहीये. समोरच्यानं मला तिकीट दिलंय ते काहीतरी विश्वासानं दिलंय. अन ज्या चार लोकांना भेटले त्यातल्या दोघांचा तरी माझ्यावर विश्वास आहे की मी काहीतरी करेन. तुमच्या पैशांसाठी त्यांचा विश्वास मी नाही तोडू शकत.'' ते मला म्हणाले, ''काय आहे तुमच्याकडे? एवढंसं झोपडं आणि त्यात तुम्ही ही इलेक्शन लढताय.'' झोपडं एवढंसं असू दे, माझी इच्छा-शक्ती खूप मोठी आहे. लोकांपर्यंत पोहोचण्याची माझ्यात ताकद आहे. मी ते करू शकते. असा विश्वास मला वाटत होता.

ह्या प्रोसेसमध्ये शिरल्यावर वाटलं की ह्या क्षेत्रात असं

काय घाबरण्यासारखं नाही. इथे काम करायची खूप गरज आहे. वस्तीतल्या बायकांसाठी हा पैसे कमवण्याचा काळ होता. ज्या माणसाच्या प्रचाराला त्या जातात. त्या माणसाला सुद्धा त्यांपैकी काही मतदान करत नाहीत. घरातला पुरुष सांगतो त्याला मत देतात. स्वतःचे असे काहीएक विचार नाही आहेत. वस्त्यांमध्ये फिरताना अशा सगळ्या गोष्टी लक्षात आल्या.

राजकारण हे बाईचं क्षेत्र नाही असं म्हटलं जातं. कारण पुरुषांना माहिती आहे जर बाई ह्या क्षेत्रात घुसली तर ती पुरुषाला पण तिथे टिकू देणार नाही. ती त्यांच्यापेक्षा खूप चांगलं काम करू शकते. खूप पुढं जाऊ शकते. ह्या क्षेत्रात खूप काही सुधारणा करू शकते.

**वातावरण बदलत चाललंय...**

आजही बायकांवर, मुलींवर खूप बंधनं आहेत. मला वाटतं ह्या सगळ्या गोष्टी सुधारायला बराच वेळ लागेल. समाजात लोक आपली-आपली जात, धर्म अधिक घट्ट पकडायला लागले आहेत. पूर्वी असं नव्हतं. १५ वर्षांपूर्वी मी लग्न केलं तेव्हा मला अजिबात भीती नाही वाटली की मी मुस्लीम आणि मी एका मातंग समाजाच्या मुलाशी लग्न करतेय म्हणून भांडणं होतील, दंगे होतील. तसं काही वाटलं नाही. पण आता प्रत्येकजण आपल्या धर्माला, आपल्या जातीलाच चिटकायला लागलाय. पूर्वी इतकं असं नव्हतं.

ईदला आजूबाजूच्या सगळ्या लोकांना बोलावलं जायचं. दिवाळीत त्यांच्या घरी जायचे पण आता असं दिसत नाही. ईदला फक्त आपल्याजवळचीच लोक बोलवली जातात. दिवाळीला पण आपाआपल्या पुरतं, आपल्या घरात केलं जातं. खूप वाईट चाललंय आपल्या समाजात. वातावरण बदलत चाललंय. पूर्वी एक मोकळं वातावरण होतं. पण आता एक अविश्वासाचं वातावरण बनत आहे.

मुस्लीम मुली मराठी शाळेत जायच्या आता मराठी शाळेमध्ये मुस्लिमांचं प्रमाण खूप कमी झालंय. ते बहुतांशी आता उर्दू शाळेत चाललेत. पूर्वी हे नव्हतं की मुस्लीम लोकांनी रमजान ईदला डीजे लावलाय. हल्ली बकरी ईद असो, रमजान असो, मोहरम असो आम्ही डीजे लावतो आणि नाचतो. त्यांनी जितक्या जोरात डीजे वाजवला त्याच्यापेक्षा आम्ही जास्त जोरात लावणार. हे वातावरण आता दिसतंय. हल्ली धार्मिक स्थळांची, मंदिरांची संख्या वाढतीये. त्यांमार्फत होणारे कार्यक्रमही वाढतायेत. चतुर्थी असली की खूप उशिरा कळायचं की आज चतुर्थी आहे. हल्ली सकाळीच कळतंय चतुर्थी आहे, कारण एवढी मंदिरे झालीत चौकाचौकात! हल्ली तर अर्धा किलोमीटरच्या अंतरामध्ये गणपतीचे चौदा मांडव दिसतात. आजकाल फक्त चतुर्थीलाच गणपतीचं गाणं वगैरे लावायचं असं नाही. तर सोमवारी महादेवाची गाणी लागतात. साईबाबाचं प्रस्थ आजकाल खूप वाढलेलं आहे. मंदिरासमोरील गर्दीवरून लक्षात येतं की आज कुठला वार आहे.

मशिदींची संख्या वाढलीये असं दिसत नाही, पण त्यांची उंची वाढलीये. एक मजल्याची आता चार मजली झालेली आहे. पूर्वी असं होतं की नमाज पढून लोक आपापल्या घरी

> माझा मुलगा साहिल १४ वर्षांचा आहे. तो राजूबरोबर खूप राहिलाय. राजू त्याला ऑफिसला, चळवळीच्या वेगवेगळ्या कामात घेऊन जायचा त्यामुळे तेथे असणाऱ्या गोष्टींचा त्याच्यावर खूप प्रभाव आहे. वस्तीत वाढदिवस असला ना, कोणाचाही तर तो त्यांच्या वाढदिवसाला जातो. जवळचा मित्र असो लांबचा असो. तो म्हणतो वाढदिवस आहे आनंदाचा क्षण आहे. हल्ली मुलं बसल्या बसल्या अनेक विषयांवर चर्चा करतात- देवाचं अस्तित्व, त्यांच्या भोवती असणाऱ्या श्रद्धा. मी निवडणुकीला उभी होते तेव्हा त्याला एका दुकानदारानं विचारलं, ''काय रे तुझी आई मुस्लीम आहे का?'' तो त्या दुकानदाराला म्हणाला, ''माझी आई एक भारतीय महिला आहे. कुठल्या जातीची धर्माची ह्याच्यानी मला काही फरक पडत नाही. ती माझी आई आहे.'' तो दुकानवाला मला येऊन म्हणाला, 'तुमचं पोरगं असं बोललं' म्हटलं, ''काय चुकीचं बोलला?''

जायचे. शुक्रवारच्या नमाजाला सगळे बुजूर्ग लोक जायचे. हल्ली पाच वर्षांच्या मुलापासून ७० वर्षाच्या म्हाताऱ्यापर्यंत सगळे जण जातातच. तिथे बायकांना शिरकाव नसल्यामुळे आत काय चाललेलं असतं हे कळत नाही आणि आल्यानंतर कुठलाही पुरुष बायकांना सांगत नाही की आज मस्जिदीत या चार गोष्टी बोलल्या गेल्या. फक्त हे सांगितलं जातं की बायांनी हे करायचं नाही, ते करायचं नाही, बायांनी हे करावं आणि बायांनी ते करावं. एवढ्याच गोष्टीवर चर्चा असते.

**जात–वास्तव जवळून कळालं**

मला १८१७ मतं पडली. निवडून आली तिला ९४०० मतं पडली. माझ्या सासरच्या नातेवाईकांमध्ये सगळ्यांनी मला मतं दिली नाहीत. तिथे माझी जात आली समोर. माहेरीही तसंच झालं. सासरी काही लोकांना प्रॉब्लेम होता की, बापाच्या नावानं का लढवलं. आणि माहेरी काही लोकांना तू या पक्षाचं चिन्ह का घेतलं? ते आपलं नाही. इथंपासून सुरुवात. आणि वस्त्यांमध्ये असं असतं ना की बाबासाहेबांच्या नावाने, फुलेंच्या नावाने ज्या सवलती मिळतात त्या हव्यात पण त्यांचे विचार नकोत. जेव्हा काँग्रेसनं मला तिकीट नाकारलं तेव्हा वस्तीतले काही कार्यकर्ते मला म्हणाले, ''आम्ही तुमच्याबरोबर नाही. निळ्या हत्तीचं चिन्हं, निळा झेंडा हातात घेणार नाही.''

माझ्यासाठी हे सगळं खूपच धक्कादायक होतं.

या काळात मला जातीचं वास्तव खूप जवळून कळलं. अजूनही आंबेडकर जयंती व अण्णाभाऊ साठेंची जयंती फक्त विशिष्ट समाजातच साजरी करतात. सगळ्या समाजाला कसं एकत्र आणता येईल याचा विचार व्हायला हवा.

हे लेख मुलाखतीवर आधारित आहे.
मुलाखत घेतली होती–अर्चना झेंडे, देविका गायकवाड
आणि वंदना कुलकर्णी यांनी.
प्रतिलेखन : सरोज वाघमारे, अभिनय कांबळे

# अन्यायाला प्रतिकार करू या

मला बऱ्याचदा एकटीनं प्रवास करावा लागतो. अशीच एकदा मी बसमधून प्रवास करत होते. मी बसमध्ये उभी होते. स्पीडब्रेकर आल्यामुळे माझा धक्का एका मुलाला लागला. म्हणजे माझा हात त्याच्या खांद्यावर पडला. मी हात बाजूला सरकवत त्याला 'सॉरी दादा' असं बोलले. पण त्याच्याच पुढे उभ्या असलेल्या मुलानं कॉमेंट केली, ''अरे दादा'' काय? परवाच तर फ्रेंडशीप डे झाला आहे.''

मला त्याच्या बोलण्याचा राग आला. तो जे बोलला ते चूक आहे की बरोबर ह्याचा विचार न करता त्याच्या कानशिलात वाजवली. झालेला प्रसंग बाजूला उभ्या असणाऱ्या व बसलेल्या मंडळींनी बघितला. गाडी थांबली. कंडक्टर काकांनी विचारले, ''काय झालं ताई?'' माझा रागाचा पारा चढला होता. उत्तर न देताच मी म्हटलं, ''त्यालाच विचारा काय झालं ते.''

बस्स. त्यानंतर पुढच्या स्टॉपवर तो मुलगा उतरला. त्या परिस्थितीत मी जे केलं ते चुकीचं होतं असं मला अजिबात वाटलं नाही. त्याच्या श्रीमुखात भडकावताना मी क्षणभर घाबरले होते. पण भीतीपोटी जर मी काहीच केलं नसतं तर तो जे वाक्य बोलला ते मला मान्य आहे असं त्याला वाटलं असतं. आणि पुढे कदाचित अजून काही बोलला असता. म्हणून मला हे करावं लागलं.

मला असं वाटतं की मी जसा प्रतिकार दर्शवला तसा तुम्हीही जर तुमच्या बाबतीत प्रसंग घडला तर त्याला बिनधास्त विरोध करा. अशा गोष्टी पाठीशी घालण्यात काहीच अर्थ नाही.

आपण बऱ्याचदा आजूबाजूचे लोक काय म्हणतील, समाज काय म्हणेल याचा विचार करतो. आणि त्यामुळे काहीच बोलत नाही. अगदी एखादी चुकीची गोष्ट आपल्या डोळ्यासमोर घडली तरी. पण आता आपण स्वतः खंबीर होऊ, या समाजात होणाऱ्या अशा घटनांना नक्कीच विरोध करू या. स्वतःपासूनच या गोष्टींमध्ये बदल घडवू या आणि आपल्या बरोबर आणखी चार जणींना पुढे नेऊ या.

**तनुजा साठे**
कुळे, साधना व्हिलेज

# सन्मानाने जगायचेय

मी ही तुमच्यासारखीच एक स्त्री. घरातील काम, मुलांना शाळेत सोडा. त्यांना घरी आणा. घर आवरा, घरातील साफसफाई करा. यातच आपला दिवस जातो. घरातील प्रत्येक व्यक्तीला कोणत्या वेळी काय पाहिजे हे सगळ्यात आधी आपल्याला कळते. त्यांच्या जेवण्याच्या वेळा. जेवण झाल्यावर अंथरुण द्या. त्यांच्या उशाला पाणी द्या. ते मात्र आरामात झोपतात. मात्र घरच्या स्त्रीला उद्या काय करायचे याचा विचार आदल्या दिवशीच करावा लागतो. तेव्हा मग तिला झोप येते. परत दुसऱ्या दिवशी नेहमीचे रुटींन सुरू!

कधीतरी आपण, आपला विचार करतो का की कुणी आपल्याला विचारते का की तुला काय पाहिजे किंवा तुला काय करायचे? हे मात्र सगळेच विसरून जातात. प्रत्येक जण आपापल्या कामात बीझी! आपणही असतो. पण आपल्या स्वतःसाठी नाही.

प्रत्येक स्त्रीने चूल आणि मूल याच्यामध्येच आयुष्य घालवायचे का? का ती स्वतःचा विचार करू शकत नाही? का ती प्रत्येक वेळी दुसऱ्याचाच विचार करते? असे का? कारण ती एक स्त्री आहे. तिला तिचे स्वप्न, तिची इच्छा, तिचे विचार मांडण्याचा अधिकार कधीतरी मिळेल का? तिला सन्मान मिळेल का?

आजही सर्वसामान्य स्त्रिया मनात इच्छा असूनसुद्धा काहीच करू शकत नाहीत. कारण त्यांना तेवढा सर्पोट नाही किंवा परिस्थितीमुळे त्यांना काहीच करता येत नाही. मग स्त्रियांनी काय करावे, असा प्रश्न तर पडतोच.

आज आपल्या देशात स्त्रियाही फार पुढे गेलेल्या आहेत. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढतसुद्धा आहेत. पण तेवढा सन्मान मिळतो आहे का? रोज टीव्हीवर नवनवीन बातम्या ऐकायला मिळतात आपल्याला. कुणी आत्महत्या केली, तर कुणावर बलात्कार झाला. मग ह्या अशा परिस्थितीत कसे काय आपण म्हणू शकतो की स्त्रिया स्वतंत्र आहेत. घरातून बाहेर पडल्यावर प्रत्येकाच्या नजरेला चोरून ती बाहेर पडत असते. घरात परत येताना काही विचित्र तर घडणार नाही ना ह्या शंकेची पाल मात्र मनात चुकचुकत असते.

आजही स्त्री भ्रूणहत्येचे प्रमाण वाढत आहे. मुलगी जन्माला येणार म्हणून तिला आईच्या गर्भातच मारले जात आहे. किंवा जन्मानंतर कुठे तरी फेकून दिले जाते. हेच का स्त्रीचे स्वातंत्र्य? तिला जन्माला यायच्या आधीच मारले जात आहे. का तर मुलगी आहे! आज मुलीच जन्माला नाही आल्या तर, उद्याची पिढी कुठून येणार? कारण एखाद्या नवजात बालकाला जन्म देणारी स्त्रीच आहे. तिचा असा बळी नका घेऊ. उदरातून बाळ जन्माला येते तेव्हा तिला खूप वेदना, त्रास सहन करावा लागतो. स्त्री नुसते एका बाळाला जन्म देत नाही तर स्त्रीचासुद्धा दुसरा जन्म असतो.

हुंडा ही प्रथा आपल्याला माहीत आहे. मुलीचे लग्न ठरवण्याआधी, आपल्याकडे हुंडा मागितला तर आपण काय करायचे याचे प्रत्येक बापाला टेन्शन असते, मग या टेन्शनमुळेच घरात मुली नको असा विचार केला जातो. मग इथे जर आपला समाज सुधारलेला नाही किंवा त्यांच्या विचारात जोपर्यंत प्रकाश पडत नाही तो पर्यंत हे असेच चालू राहणार. मग त्यासाठी काय करावे?

तर समाजाने किंवा प्रत्येक माणसाने आपल्या स्वतःपासूनच बदलाची सुरुवात केली पाहिजे. आपणच आपल्या समाजातील रीतिरिवाज, परंपरा यांना आळा घालू शकतो. तरच प्रत्येक स्त्रीला समाजामध्ये सन्मान मिळू शकेल. आणि तेव्हाच खऱ्या अर्थाने आपला देश, समाज स्वतंत्र झाला असे आपण म्हणू शकू.

**प्रेरणा मेस्त्री,**
ऊर्मी, नेरे दत्तवाडी

**पुस्तकपरिचय**

# आकाश पेलताना




आलोचनाच्या वंदनाताईंचा मला फोन आला. ''आकाश पेलताना हे पुस्तक आलोचनाने प्रकाशित केले आहे, ते वाचून त्यावर लिहिशील का?'' वंदनाताईंना माझ्या वाचनाचा कासवासारखा वेग माहिती नव्हता. पण त्या म्हणाल्या, ''तू करू शकशील. त्या निमित्ताने पुस्तक वाचले जाईल.'' त्यांच्या प्रोत्साहनामुळे मी लिहायचे कबुल केले. पुस्तक वाचायला घेतले आणि चक्क तीन दिवसात पुस्तक वाचून झाले होते. माझ्या संपूर्ण आयुष्यातील हे पहिले पुस्तक जे मी तीन दिवसात वाचून संपवले किंवा त्या पुस्तकाच्या सळसळत्या स्त्रीमुक्तीवादी विचारांच्या नायिकांनी केलेल्या कामांने मला ते वाचायला भाग पाडले असावे.

'आकाश पेलताना... परिवर्तनाच्या वाटेवर' किती सार्थ नाव आहे. आकाशाएवढ्या अनंत अडचणी असताना देखील समाजासाठी झोकून देणाऱ्या या रणरागिणींना माझा सलाम. यात कहाण्या आहेत प्रेमा पुरव, प्रा. कुमुद पावडे, शांता रानडे, डॉ. सीमा साखरे आणि सुमन बंग या झंझावती वादळांच्या. त्यांचा जन्म हा १९२५ ते १९३८ या कालावधीतला. माझ्या जन्माच्या तब्बल ५० वर्ष आधीचा. आणि मी आज गावपातळीवर जे काम करते त्याच्या ९० वर्ष आधीचा. मुद्दाम नमूद करावेसे वाटते, कारण त्या काळी त्यांना त्यांच्या वैयक्तिक जीवनात आलेले अनुभव थोड्याफार फरकाने आजही आपल्याला येतात. त्याकाळी त्यांनी महिलांसाठी सुरू केलेल्या चळवळींची आज देखील तेवढ्याच प्रमाणात किंबहुना त्यापेक्षा कितीतरी जास्त प्रमाणात गरज आहे याची जाणीव पुस्तक वाचताना पावलोपावली होते.

प्रेमा पुरव यांनी सुरुवातीला त्यांच्या जन्माची कहाणी सांगताना, आईने कसे त्यांनी जन्माला येऊच नये म्हणून प्रयत्न केले हे सांगितले आहे. ते वाचत असताना आज देखील शिकलेल्या व आडाणी अशा सगळ्याच प्रकारच्या महिलांना आजही, किती मुले जन्माला घालायची आणि कधी घालायची ठरवण्याच्या अधिकारापासून वंचित रहावे लागते आहे याची जाणीव होते. अन्नपूर्णाच्या माध्यमातून प्रेमाताईंनी महिलांना स्वाभिमानाने स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा मार्ग दाखविला. बचतगटाच्या चळवळीच्या माध्यमातून कामाला सुरुवात केली. ज्या बाईला बँकेत खाते उघडण्यासाठी अनेक चकरा माराव्या लागल्या होत्या तीच बँक आता त्याच महिलांसोबत करोडोचे व्यवहार करत आहे; हा खूप मोठा पल्ला आहे. विकासामध्ये महिलांची भागीदारी आहे. 'घर दोघांचे' यासाठी जीआर असावा ही गरज त्याकाळी प्रेमाताईंनी मांडली होती. आजदेखील महिलांना हक्काचे छप्पर मिळण्यासाठी तेवढाच संघर्ष करावा लागत आहे. सुमनताईंचे शेतीवर आधारित वेगवेगळ्या प्रयोगांमध्ये दिलेले योगदान मोलाचे आहे. भूदान आंदोलनामधून भूमीहीन शेतकऱ्यांना जमीन मिळावी यासाठी केलेले कार्य सातत्याने पुढे गेले असते तर आज शहरांमध्ये बकाल वस्त्या व तिथले ग्रामीण भागातून

रोजगारासाठी आलेल्या लोकांचे स्थलांतरितांचे जीवन जगण्यासाठीचे संघर्ष काहीप्रमाणात तरी कमी झाले असते असे वाटते.

शांताताई रानडे यांचा जीवनप्रवासही खूप प्रेरणादायी वाटतो. शांताताईंना त्यांच्या तरुणपणी ज्या पद्धतीचे वातावरण मिळाले, वेगवेगळ्या पुस्तकांच्या माध्यमातून, स्टडी सर्कलच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नाविषयीची संवेदनशीलता ज्या प्रकारे निर्माण केली गेली त्याचप्रकारच्या कामाची खूप गरज आहे असे प्रकर्षाने जाणवते. खरेतर ही संवेदनशीलता आपल्या शिक्षणपद्धतीतूनच यायला पाहिजे, या प्रकारच्या अभ्यासक्रमाची आपल्याला नितांत गरज आहे. पण अनेकवेळा युवांसोबत आणि खासकरून तरुणींसोबत काम करत असताना सामाजिक प्रश्नांविषयी संवेदनशीलता, मग तो स्वतःला भेडसावणारा प्रश्न असला तरी खूप कमी असल्याचे दिसून येते.

या सगळ्यांचाच शिक्षणासाठीचा संघर्ष खूपच प्रेरणादायी आहे. कुणाला गरिबीमुळे तर कुणाला मुलगी म्हणून. 'मुलगी शिकून काय करणार' या विचाराने शिक्षणापासून वंचित ठेवले गेले. पण त्यांच्यातल्या शिक्षणाप्रती असणाऱ्या आस्थेपायी त्यांनी शिक्षणाकडे कधीच पाठ फिरवली नाही. उलट कठीण परिस्थितीतही त्या आजीवन शिक्षण घेत राहिल्या. सीमा साखरे यांनी शिकता यावे म्हणून शाळेच्या आवारातच लहानपणी शाळेत जाणाऱ्या मुलांना ताक विकून त्यामोबदल्यात त्यांच्याकडून ज्ञान संपादन केले. 'तुला पीएचडी करताच येणार नाही.' असे म्हणणाऱ्या दारूड्या व मारहाण करणाऱ्या नवऱ्याच्या नाकावर टिच्चून अथक प्रयत्नाने डॉक्टरेट मिळवली. कुमुद पावडे यांनी दलितांना संस्कृत भाषा शिकण्यावर बंदी होती म्हणून मुद्दाम संस्कृत विषयात एम.ए.पर्यंतचे शिक्षण घेतले. इतकेच नाही तर महाविद्यालयात संस्कृत शिकवलेदेखील. सुमनताईंचे जीवनाभिमुख, जीवनाधारित शिक्षण देणाऱ्या शाळेचा प्रयोग आत्ताच्या परिस्थितीत फारच मोलाचा वाटतो. आदिवासी, भटक्या विमुक्त समाजातील मुलांना जीवनाभिमुख, जीवनाधारित शिक्षण दिल्यास त्यांचे शाळेत रमण्याचे प्रमाण नक्कीच वाढेल याची जाणीव होते. आपण खेडोपाडी, वस्ती पाड्यावर पोहचवून स्त्रिया व मुलींना शिक्षणासाठी प्रवृत्त करण्याची हाती घेतलेली जबाबदारी किती नेटाने पुढे नेण्याची गरज आहे याचीही जाणीव होते.

या आत्मकथनातील कुमुद पावडे यांचे एक वाक्य हृदयाला भिडले. 'नोकरी मिळाली ती कुमुद पावडे'ला 'सोमकुवर या नावामुळे त्यांना जो जातीभेद सोसावा लागला.' तो मी खूप चांगल्या प्रकारे समजू शकते. कारण माझ्या कामामुळे प्रभावीत होणाऱ्या, मला भेटण्यासाठी उत्सुक असणाऱ्या, जातीच्या उतरंडीत स्वतःला वर समजणाऱ्या तथाकथित अनेक लोकांना जेव्हा माझे आडनाव समजते, तेव्हा त्यानंतरच्या प्रतिक्रिया आजदेखील मला तेवढ्याच बोचतात.

कोणत्याही बदलाची सुरुवात स्वतःपासूनच होते याचा आदर्श या प्रत्येकीच्या जीवनातून दिसतो. मग तो आंतरजातीय लग्न करून धर्माच्या चाली-रिती, परंपरा यांना कुमुदताईंनी दिलेले आव्हान असो किंवा शांताताईंनी त्याकाळी २० रुपयात केलेले रजिस्टर लग्न असो. सीमाताईंनी त्याकाळी मुस्लीम समाजातल्या स्त्रियांबरोबर काम करायचे म्हणून कपाळावरची टिकली काढून हिंदू स्त्रीच्या स्त्रीपणाच्या चौकटीला तेवढ्याच सहजतेने मोडणे असो किंवा सुमनताईंनी, पैसे कमवून देणारे पुरुषांनी हस्तगत केलेले उद्योग महिलांनी का करू नयेत, असे विचार पुढे करून पुरुषप्रधान संस्कृतीला दिलेले आव्हान असो. नाहीतर वयाच्या ६४ व्या वर्षी रशियन भाषा शिकायला सुरुवात करून शिक्षणाला वयाची मर्यादा नसते, याचे उदाहरण ठेवणाऱ्या शांताताई. मिळकत कितीही असो त्यातला किमान काही हिस्सा समाजविकासासाठी, चळवळीसाठी द्यायचा हा शांताताई पाळत असलेला नियम किती आवश्यक आणि महत्त्वाचा आहे. हे स्पष्ट दिसते.

हे पुस्तक हाती आले त्याचवेळेस एका केस संदर्भात मला फोन आला. एका शिक्षक मुलीने आत्महत्या केली होती, पण तिच्या नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार तिला तिच्या नवऱ्याने व सासूने मारले. हे सर्व ऐकत असताना सीमाताईंनी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात सुरू केलेल्या चळवळीचे महत्त्व अधोरेखित झाले. आपल्या समाजात लग्न टिकवण्याची जबाबदारी प्रामुख्याने बाईवर लादलेली असते. ही जबाबदारी पार पाडता पाडता बाईला एकतर जीव द्यावा लागतो किंवा तिचा जीव

घेतला जातो. ही परिस्थिती बदलण्यासाठी व सक्षमीकरणाचा खरा अर्थ सर्व स्तरातल्या महिलांना समजण्यासाठी याकामात त्यांना जोडून घेण्याची गरज जाणवते.

या पाचही जणींचे जीवनकार्य, त्यांचे स्वांतत्र्य चळवळीतील योगदान, स्वतःच्या जीवनात स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याची धडपड त्याचबरोबर महिलांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी तेवढ्याच खंबीरतेने प्रयत्न करणे, अन्यायाविरुद्ध लढताना वेळप्रसंगी तुरुंगात जाणे हे सगळे अचंबित करणारे आहे आणि तितकेच प्रेरणादायीही आहे. स्त्रियांचे स्वातंत्र्य चळवळीतील, विकासामधील योगदान प्रकाशात आणण्यासाठी आतापर्यंत स्त्रियांना 'चूल आणि मूल' या भूमिकेतच पाहू इच्छिणाऱ्या समाजाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे आहे.




**डावीकडून शांता रानडे, सीमा साखरे, रोहिणी सहानी, कुमुद पावडे, प्रेमा पुरव आणि मेधा कोतवाल-लेले**

हे पुस्तक ज्या कुणाच्या वाचनात येईल तो स्वतःच्या परिने स्त्री चळवळीमध्ये, समाजविकासाच्या कामामध्ये हातभार लावल्याशिवाय राहणार नाही. हा माहिती नसलेला व लिहिला न गेलेला स्त्रियांच्या कर्तृत्वाचा इतिहास आलोचना संस्थेने आमच्यासारख्या कार्यकर्त्यांपर्यंत व समस्त समाजापर्यंत लेखीस्वरूपात पोहचवल्याबद्दल आलोचना टीमचे आभार!

**प्रभा जाधव**

वर्क फॉर इक्वॅटी, तळेगाव दाभाडे

# अविस्मरणीय प्रकाशन-सोहळा

**'आकाश पेलताना' परिवर्तनाच्या वाटेवर या पुस्तकाच्या प्रकाशन-समारंभाला साधना व्हिलेजच्या मेधा टेंगशेंबरोबर काही तरुण मुली आवर्जून उपस्थित होत्या. या मैत्रिणींचा अनुभव त्यांच्याच शब्दात.**

खूप छान वाटले मला या कार्यक्रमाला जाता आले. प्रेमा पुरव यांचे आत्मकथन ऐकल्यावर तोंडातून 'बापरे' असा शब्द फुटल्याशिवाय राहिला नाही. किती समस्यांना तोंड देऊन त्या जिद्दीने लढल्या! खरेच अशा स्त्रियांची आपल्या देशाला खूप गरज आहे. सीमा साखरे, शांता साठे व कुमुद पावडे या सर्वांचे आत्मकथन-देखील मला खूप आवडले, अशा कार्यक्रमांना मला पुन्हा पुन्हा जायला नक्की आवडेल.

**प्रिया साठे**

चिखलगाव, साधना व्हिलेज

माझ्या आत्तापर्यंतच्या जीवनात मी पहिल्यांदाच अशी गोष्ट पाहिली, ऐकली. खूप छान वाटलं. मी पण एक मुलगी, एक स्त्री आहे. याचा खूप अभिमान वाटला मला. खूप छान कामगिरी केली त्या सर्व स्त्रियांनी. स्त्रियांसाठी जे काही योगदान दिलं आहे. ते खूप महत्त्वाचं आहे. त्यांची कामगिरी पाहून असं वाटलं की आपणही स्त्रियांसाठी काहीतरी करू शकतो.

मी त्या स्त्रियांनी स्त्रियांसाठी केलेल्या व देशासाठी केलेल्या कामगिरीबद्दल आयुष्यभर ऋणी राहील. खूप छान

वाटलं मला त्या स्त्रियांना भेटून. मी फक्त पुस्तकातच काही स्त्रियांच्या गोष्टी वाचल्या होत्या. पण मला ते साक्षात अनुभवायलाही भेटलं, मला छान वाटलं.

**प्रतीक्षा कांबळे**
नांदगाव, साधना व्हिलेज

आकाश पेलताना परिवर्तनाच्या वाटेवर... पुस्तक-प्रकाशनाच्या अतिशय सुंदर अशा कार्यक्रमामध्ये मला उपस्थित रहाता आलं. खरंच विश्वासच बसत नव्हता की राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार स्वीकारणाऱ्या महिलांमध्ये मी बसले आहे.

स्वतः पुढाकार घेऊन स्वतःबरोबर इतरांनाही पुढे घेऊन जाणाऱ्या या महिलांप्रमाणे आपणसुद्धा कुठेतरी खारीचा वाटा उचलावा अशी मला मनापासून इच्छा आहे, आणि मी नक्की ह्या कार्यामध्ये पुढाकार घेणार आहे.

सीमाताई, कुमुदताई, शांताताई, प्रेमाताई, सुमनताई या सर्वांचं कार्य अगदी अवर्णनीय आहे. त्यामध्ये मी सीमाताई साखरेंचा प्रामुख्याने उल्लेख करेन. स्त्रियांचे होणारे शारीरिक शोषण हा मुद्दा मनाला खूप भिडला. त्यांनी पीडित महिलांना समाजात पुन्हा स्थान मिळवून दिलं, नवीन आयुष्य मिळवून दिलं, न्याय मिळवून दिला. स्वतःला होणाऱ्या त्रासातून सतत संघर्ष केला आणि अजूनही करत आहेत. खरचं त्यांना मनापासून सलाम.

मी नर्सिंगचं शिक्षण घेतलेलं आहे. माझ्या आजूबाजूचं वातावरण, समाजातल्या काही अंधश्रद्धा त्यातून होणारे गैरसमज, वाढत्या वयातल्या मुलींचे प्रश्न आणि त्यातून त्यांना योग्य पद्धतीचं शिक्षण याबद्दल मी काय करू शकते हे मला समजायला लागलं आहे. आणि मला वाटतं याची सुरुवात मी स्वतःपासून करू शकते आणि त्यामध्ये अनेकांना पुढे नेऊ इच्छिते. ह्या सर्वांकडून मला प्रेरणा मिळाली आणि त्याचा मी नक्कीच योग्य उपयोग करून घेईन.

**तनुजा साठे**
कुळे, साधना व्हिलेज

# पत्रास कारण की...

स्वातीताई कोयरे मंथन गटाच्या सदस्य आहेत. या गटासोबतच्या पहिल्या मिटींगमध्ये आम्ही सावित्रीबाई फुल्यांनी ज्योतीबांना लिहिलेली पत्रं वाचून त्यावर चर्चा केली होती. आणि गृहपाठ म्हणून पत्र लिहायला सांगितलं होतं. एकट्या स्वातीताईंनी ते लिहिलं. त्यांना तिसरीनंतर शाळेत जायची संधीही मिळाली नाही. त्यामुळे लिहा-वाचायची अडचण येते. तरी त्यांनी एकटीनंच पत्र लिहून आणलं. म्हणून त्यांचं विशेष कौतुक वाटतं. त्यांचं पत्र काहीही बदल न करता तसंच्या तसं इथे देत आहोत.

प्रिय सिताराम,
मी तूमाला लीहीते की आज मला कळले की तूम्ही नसला तेवा खूप विच्यार येतातं, तूमी खूप लाम कामाला जातातं तीकडे जाताना रासता खराब आहे ना। मग मला भीती वाठते। असे वाटते कि तुमाला जाऊ देऊ नहे। सगळ्यात मोठी गोष्ट आहे मूले माझे काही आयकत नाही। मग मला खूप राग येतो। पण काय करनार मला खूप कामे आसतात। ब्लाऊज शीवायचे असतात। त्यामूळे लक्ष देता येत नाही। मूलांना वाटते की आईचे लक्ष नाही। पण माझे खूप लक्ष आसते तरी ती मात्र खेळन्यात बीजी असतात। कंदीच आभ्यास करत नाही। असं केल्यानी ती कशी पूडे जायाची। माझी ईछ्या आहे की ती खूप पूडे जावी। मग माला खूप आभीमान वाटल। माझी मान मोठी होईल। माझा साठी खूप आनंदाचा दीवस असेल।
कळावी
तूमची
स्वाती

# बदल शक्य आहे !

कागद काच पत्रा कष्टकरी पंचायत आणि स्वच्छ या कचरावेचकांच्या हक्कासाठी काम करणाऱ्या पुण्यातल्या संघटना-संस्था आहेत. सभासदांच्या जाणीव - जागृतीसाठीही त्या विविध उपक्रम राबवत असतात. अशाच एका उपक्रमाचा भाग म्हणून त्यांनी 'स्त्री चळवळ' या विषयावर 'आलोचना'च्या मेधाताई कोतवाल यांचं भाषण ठेवलं होतं. मेधाताईनी अनेक उदाहरणं देत, पोस्टर्स दाखवत विषय अतिशय सोप्या पद्धतीनं मांडला. त्यानंतर त्यावर चर्चाही सुरू झाली. जातव्यवस्था संपवायची असेल तर आपण आंतरजातीय विवाह केला पाहिजे असा विचार मेधाताईनी मांडला. आणि त्यावर सभासदांची मतं जाणून घेतली. त्यातल्या काही सभासदांना हा विचार पटत होता. पण 'आपल्याला जातीचा अभिमान असला पाहिजे आणि तो असतो. तर आपण आंतरजातीय विवाह का करायचा?' अशीही मतं आली. त्यानंतर स्त्री - पुरुष समानता हा विषय होता. आणि ती आपल्या घरापासून सुरुवात करता येऊ शकते, पुरुषांचाही घरातल्या कामात सहभाग असायला पाहिजे असे विचार मांडल्यानंतर सभासदांपैकी एक ताई उठल्या आणि म्हणाल्या, ''असं कसं आमचे पुरुष घरातलं काम करतील? ते खानदानी आहेत. आणि बायका असताना पुरुषांनी घरातली कामं का करायची?'' सभासदांमध्ये आपापसात चर्चा सुरू झाली. ही सगळी चर्चा सुरू असताना संघटनेसोबत खूप वर्ष जोडलेल्या सुमनताई उठल्या आणि खूप शांतपणे त्यांनी स्वतः मध्ये घडवून आणलेला बदल सांगायला सुरुवात केली, ''जेव्हा मी लग्न करून सासरी आले तेव्हा मला खूप बंधन होती. कुठलीही गोष्ट मी माझ्या मनाने करू शकत नव्हते. कुठलेही निर्णय घेऊ शकत नव्हते. एकदा मी घरात न विचारता माझ्या मनाने भाजी बनवली तर ती संपेपर्यंत दोन दिवस मला खावी लागली. कागद काच पत्रा संघटनेमध्ये काम करायला लागल्यापासून माझ्यात आत्मविश्वास आला. महिलांना जी वागणूक दिली जाते ती चुकीची आहे. याची मला जाणीव झाली. त्याही दिवसभर घराबाहेर कष्टाचं काम करतात आणि तरीही घरी आल्यावर पुन्हा घरातली कामं, मुलांच्या जबाबदाऱ्या त्यांनाच सांभाळाव्या लागतात. त्यात पुरुषांचा सहभाग मिळाला तर त्यात काय वाईट आहे? ही सगळी बायकांची कामं असतात हे कुणी ठरवलं? घर दोघांचं असतं. त्यामुळे दोघांनीही घरांतल्या कामांची जबाबदारी घ्यायला पाहिजे.'' त्यांच्या नवऱ्याचा घरकामात किती सहभाग असतो हे त्यांनी सांगितलं. ''घरकाम करण्यात लाज कसली? आपल्या व्यक्तीला समजून घेणं आणि गरज पडेल तिथे एकमेकांना मदत करणं हेच तर प्रेम असतं ना?'' त्या म्हणाल्या. ''हा सगळा बदल स्वतःमध्ये व घरामध्ये केल्यानंतर मुलांवरही खूप चांगले संस्कार झाले. मुलंही लहानपणापासून घरात पडेल ते काम करायला लागली. लग्न झाल्यावरही त्यांचा घरकामात सहभाग असतो. महिलांकडे बघण्याचा त्यांचा दृष्टीकोन खूप चांगला आहे. वस्तीत कुणी महिलांना शिवी दिली किंवा काही त्रास दिला तर लोक लगेच माझ्या मुलांना सांगायला येतात; हे बघून छान वाटतं. 'पुरुष खानदानी असतात, त्यांनी घरकाम केलं तर त्यांची इज्जत जाईल; घरकाम हे फक्त बायकांचं काम आहे. ते पुरुषांनी केलं तर लोक नाव ठेवतात,' हे सगळं आपल्याला मनातून काढून टाकून त्याच्यावर काम करावं लागतं. आणि त्यानंतरच बदलाची प्रक्रिया सुरू होते. कारण मग आपण महिलांकडेही माणूस म्हणून बघायला लागतो.''

संघटनेत काम करायला लागल्यापासून सुमनताईंमध्ये झालेला हा बदल होता. त्यांच्याकडून भर सभेत हे अनुभव ऐकणं हा आमच्यासाठीही समृद्ध करणारा अनुभव होता. संघटनेची ताकद दाखवणारा, 'बदल शक्य आहे' हे सांगणारा! सशक्तीकरणाचं यापेक्षा वेगळं उदाहरण ते काय असणार?

**देविका गायकवाड**

आलोचना




# लेखनात रमलेल्या माय-लेकी
## शिवानी आणि मृणाल पांडे

**शिवानी या हिंदीतल्या सुप्रसिद्ध लेखिका आहेत. त्यांचं मूळ नाव गौरा पंत. 'शिवानी' हे त्यांनी लेखनासाठी घेतलेलं नाव होतं. त्यांची कन्या मृणाल पांडे याही लेखक, संपादक आहेत. लेखनक्षेत्रात आपला ठसा उमटवणाऱ्या माय-लेकींविषयीचा हा लेख...**

गौरा पंत एक अत्यंत हुशार, प्रतिभाशाली स्त्री होत्या. त्यांना संगीतामध्ये खूप रस होता. गाणं गायची आवड होती. परंतु त्यांच्या सासऱ्यांना त्यांचा हा छंद अजिबात पसंत नव्हता आणि त्यामुळे गौराताईंना आपला हा छंद सोडावा लागला. पण म्हणून हताश होणाऱ्या, निराश होणाऱ्यांपैकी गौराताई नव्हत्याच. त्यांनी आपला लेखन हा दुसरा छंद, दुसरी आवड जोपासायचं ठरवलं. आणि लिहायला सुरुवात केली. पण इथे मात्र त्यांनी सावधगिरी बाळगली आणि 'शिवानी' या नवीन नावाने लिहायला सुरुवात केली. कारण त्यामुळे त्यांच्या सासऱ्यांनासुध्दा त्यांच्या लेखन-छंदाचा पत्ता लागणार नव्हता. आणि विना अडथळा, मोकळेपणाने त्या लिहू शकणार होत्या.

गौरा उर्फ शिवानी यांचं बालपण उत्तर भारतातल्या कुमायुँ या पहाडी भागात गेलं. त्यांच्या वडीलांनी राजकोट त्याच प्रमाणे इतरही संस्थानांमध्ये दिवाण म्हणून काम केलं. शिवानी पदवीधर होत्या. त्यांचं शालेय शिक्षण शांतिनिकेतन या जगप्रसिध्द संस्थेमध्ये झालं. शांतिनिकेतनची स्थापना महान कवी रविन्द्रनाथ टागोर यांनी केली होती. टागोर स्वत: तिथे शिकवत असत. शिवानी या त्यांच्या पहिल्या तुकडीच्या विद्यार्थिनी होत्या. लहानपणापासून त्यांना लिहिण्याची आवड होती. वयाच्या बाराव्या वर्षीच त्यांची पहिली कथा छापून आली होती.

बी.ए पास झाल्यावर लगेचच शिवानी यांचं लग्न विधुर सुखदेव पंत ह्यांच्याशी झालं. ते शिक्षक होते. दुर्दैवानं सुखदेव यांचंही निधन लवकर झालं आणि कुटुंबाच्या पालन-पोषणाची सर्व जबाबदारी शिवानी यांच्यावर येऊन पडली.

शिवानींची मुलगी मृणाल पांडे यादेखील एक नावाजलेल्या लेखिका, पत्रकार, संपादक आहेत. एका मुलाखतीत मृणाल यांना त्यांच्या आईविषयी विचारण्यात आलं होतं. तेव्हा त्यांनी सांगितलं होतं, ''आई सगळी कामं करायची. स्वयंपाक, धुणं-भांडी, साफसफाई आणि त्याशिवाय तिने कितीतरी पुस्तकं लिहिली आहेत. जेव्हा तिच्याकडे वही घ्यायलाही पैसे नसत तेव्हा ती आमच्या वहीतल्या उरलेल्या जागेत लिहायची आणि तेच संपादकाला पाठवून द्यायची. स्वतंत्र खोलीत, स्वत:ला बंद करून लिहिण्याची सुविधा तिच्याकडे नव्हती. तिच्या एकटीवर आम्हा चार मुलांची आणि नातेवाईकांच्या दोन मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी होती. असं असूनही जेव्हा केव्हा तिला लिहिण्यासाठी वेळ मिळायचा तेव्हा ती लिहायची. घरात सतत इतकं सारं काम असतानासुद्धा ती लिहायची. त्यातून काही पैसेही मिळायचे. त्यातून आमच्या शाळेची फी, गणवेषाचा खर्च निघायचा.'' शिवानी यांनी कथा, कादंबऱ्या, प्रवास-वर्णन, लेख अशा सर्व प्रकारचं विपुल लेखन केलेलं आहे.

शिवानी यांची 'चौदह फेरे' (चौदा फेरे) ही कादंबरी 'धर्मयुग' ह्या सुप्रसिध्द पत्रिकेत दर आठवडयाला क्रमश: प्रसिध्द होत होती. वाचक त्यांना पत्र लिहून विनंती करायचे की कादंबरीचा शेवट दु:खद करू नये. त्याचं लेखन मुख्यत: स्त्रिया आणि त्यांचं दैनंदिन आयुष्य आणि त्यामध्ये घडणाऱ्या घटना यांच्याभोवती केंद्रित असायचं. कादंबरीचा एकेक भाग जेव्हा पत्रिकेच्या ऑफीसमध्ये पोहोचायचा तेव्हा तिथल्या कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड उत्सुकता असायची. तो सर्वात आधी आपल्याला वाचायला मिळावी यासाठी त्यांच्यामध्ये चढाओढ लागायची. संपादकही त्यांच्या कथा दीर्घकाळ चालतील यासाठी

प्रयत्न करायचे, कारण या लोकप्रिय कादंबरीमुळे त्यांच्या पत्रिकेचा खप खूप वाढत असे.

मृणाल आपल्या आईने लिहिलेल्या गोष्टी वाचायची आणि त्यात सुधारणा करायची. हा संपादनामधला त्यांचा पहिला धडा होता. शिवानी फटकळ तर मृणाल लाजाळू. मृणाल यांची बहीण इरा यादेखील लेखन करतात. एका मुलाखतीत त्या सांगतात की त्यांच्या आईने नेहमीच त्यांच्या मुली त्यांच्यासारख्याच स्वावलंबी, कणखर व्हाव्यात यासाठी प्रयत्न केले. त्यांना त्यांच्या मनासारखं जगायची, स्वतंत्र निर्णय घ्यायची प्रेरणा दिली. ज्या गोष्टी त्यांना पूर्ण पटत त्याच त्या करत असत. शिवानी यांचा खेळकर स्वभाव त्यांच्या मुलानातवडांना खूप आवडायचा. त्यांना पद्मश्री आणि इतरही अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.

मृणाल पांडे यांनाही पद्मश्री पुरस्कारानं सम्मानित करण्यात आलेलं आहे. 'हिंदुस्तान टाईम्स' या एका मोठ्या वर्तमानपत्राच्या पहिल्या महिला संपादक होण्याचा मान मृणाल यांना मिळालेला आहे. प्रसारभारतीचं अध्यक्षपदही त्यांनी भूषवलेलं आहे. अखिल भारतीय पत्रकार संघटनेचे मानाचे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. त्या हिंदी आणि इंग्रजी भाषेतून लेखन करतात. शिवानी या ललित स्वरूपाचं लेखन करत तर मृणाल पांडे गंभीर स्वरूपाचं लेखन करतात. असंघटित आणि अनौपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारांच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या 'श्रमशक्ती' अहवाल समितीच्याही त्या सदस्य होत्या. त्यांनीही नाटक, लेख, कादंबरी अशा प्रकारचं लेखन केलेलं आहे.

साभार : 'जैसी माँ, वैसी बेटी' या 'वाचा' या संस्थेने प्रकाशित केलेल्या पुस्तकातून.

अनुवाद : **वंदना कुलकर्णी**

# तुम्हाला काय वाटतं?


माझी बहीण मुस्कान इयत्ता ९ वीत शिकत आहे. नुकतचं त्यांच्या शाळेचं गॅदरिंग झालं. मुस्काननंही त्यामध्ये भाग घेतला होता. मीही त्याच शाळेत १० वीपर्यंत शिकले आणि आता कॉलेजही तिथंच करत आहे. त्यामुळे गॅदरिंगबद्दल मला खूप उत्सुकता होती. सरावाविषयी चर्चा सुरू असताना आमचं गाणं अजून ठरत नाहीये असं तिनं सांगितलं. खरंतर दोन दिवसांपूर्वी अर्ध्या गाण्यावर डान्स बसवून झालाय असं तिनं सांगितलं होतं आणि आता ती काही वेगळंच म्हणत होती– अजून गाणं ठरत नाहीये असं. ती असं का म्हणतीये असा मला प्रश्न पडला. तेव्हा तिनं सांगितलं, ''जे गाणं आम्ही निवडलं होतं ते गाणं एका गे व्यक्तीनं (समलिंगी पुरुषानं) लिहिलं आहे असं आमच्या मॅडमना शाळेतल्या दुसऱ्या मॅडमकडून कळालं. ते गाणं तुम्ही घेऊ नका लोक त्यावर खूप शिट्ट्या वाजवतील. आपल्याला समाजापुढे डान्स करायचा आहे असं त्यांनी सांगितलं.'' गेनं लिहिलेल्या गाण्यावर आपल्या शाळेत डान्स होऊ नये अशीच मुख्याध्यापकांची भूमिका होती.

या सगळ्या विचारांचा आता मला खूप त्रास होतो. आलोचनामध्ये काम करायला सुरवात केल्यापासून मला बऱ्याच गोष्टी कळल्या. इथं वेगवेगळ्या विषयांवर चर्चा होते. त्यातून माझी समज वाढत गेली. आणि सगळ्यात महत्त्वाची गोष्ट मी जी शिकले ती ही की प्रत्येक व्यक्तीकडे माणूस म्हणून बघायचं आणि मला असंच वाटतं की ही छोटी गोष्ट आपण सगळ्यांनी करायची ठरवली ना तरी खूप साऱ्या समस्या सुटतील. या गोष्टीचा म्हणूनच मला खूप त्रास झाला की प्रत्येकाकडे माणूस म्हणून न बघता त्याला लिंग, जात, धर्म असे सगळे मुलामे लावून पाहिलं जातं. त्यांच्यामध्ये त्याआधारे भेद केले जातात. मुलांना शाळेसारख्या ठिकाणीही अशीच मूल्यं शिकवली जात असतील तर मुलांनी चांगला नागरिक बनावं ही अपेक्षा तरी आपण कशी करणार? तुम्हाला काय वाटतं?

**तनजिम खानजादे**

(तनजिम ११वीत शिकते आहे आणि आलोचनात लायब्ररी-साहाय्यक म्हणून काम करते आहे.)

# भय इथले संपत नाही...




साभार : जागोरी, चित्रकार : बिंदिया थापर, हिंदी अनुवाद : कमला भसीन (मूळ लेखन: 'बलात्कारापासून बचाव करण्यासाठी मार्गदर्शन') लंडन रेप क्रायसिस सेंटर.

आजच्या युगात महिला पुरुषांच्या बरोबरीने चालल्या आहेत. असे कुठले क्षेत्र आहे की त्यात महिला नाहीत? डॉक्टर, वकील, बस-कंडक्टर, रिक्षा-चालक म्हणून महिला काम करत आहेत. सैनिक दल, नाविक दल व हवाई दल अशा लष्करी दलांत-सुद्धा महिला पुरुषांप्रमाणे उभ्या आहेत. पण या महिलांचे अस्तित्व सुरक्षित आहे का? मग ती महिला नोकरी करणारी असो, व्यवसाय करणारी असो वा गृहिणी असो. जगाच्या पाठीवर महिला कुठेही सुरक्षित नाही. याचे कारण काय? आज आपण ज्या समाजात राहतो तिथे आहेत का मुली सुरक्षित? महिलांवर होणाऱ्या अत्याचारांमध्ये अल्पवयीन मुलींचे प्रमाणही जास्त आहे. जी मुलगी शाळेत जाते किंवा खेळायला जाते ती मुलगी घरी येईपर्यंत आई-वडलांचे डोळे तिच्या वाटेकडे लागलेले असतात. ती मुलगी सुरक्षित घरी येईपर्यंत चैन पडत नाही. असे का? मग मुलीने घराबाहेर पडायचेच नाही का? आणि मग भीतीपोटीच आपणही तिच्यावर अनेक बंधने घालतो.

आपण रोज वर्तमानपत्रात वाचतो, टिव्ही वर पाहातो, वॉट्स ॲप, फेसबुक यांवर बघतो असा एकही दिवस नाही ज्या दिवशी मुलींवरच्या अत्याचाराची बातमी नाही, 'मुलीला पळवून नेले, तिचा बलात्कार करून खून केला.' तो खून करणारा सराईत गुंडच असतो असे नाही तर शाळेच्या बसचा ड्रायव्हर, डॉक्टर, शिक्षक, वा शेजारी राहणारा मुलगा किंवा चुलत भाऊ, मावस भाऊ असा कोणीही असतो. अशा नराधमांना कडक शिक्षा दिली पाहिजे.

आपण रोज बातम्या ऐकतो. किती लहान वय असते त्या मुलींचे! त्या मुलीवर चार-पाच जण बलात्कार करतात ती मुलगी मरेल की जगेल याचाही विचार करत नाहीत. त्यांना आपल्या वासनेचा बळी करतात. किती भयानक घटना आजूबाजूला घडतात! कोपर्डीतली घटना आठवली की अंगावर काटा येतो. डोळ्यातून पाणी येते. हे तर लांबचे होते पण काल परवा ही घटना आमच्या गावातल्या वाडीत घडली. चौदा वर्षांची पोर सकाळी शेळ्या घेऊन चारायला जाते. पण संध्याकाळी ती न येता तिचें प्रेत घरी येते. काय अवस्था झाली असेल तिच्या आई-वडलांची. याचा विचार जरी केला तरी डोळ्यात पाणी येते. मुलींवरचे हे अत्याचार कधी थांबणार? या अत्याचारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. जे वय मुलींचे खेळण्याबागडण्याचे आहे त्या वयात मुली आई होत आहेत. ज्या मुली या वासनेच्या शिकार झाल्या आहेत त्या मुलींचे पुढे काय? त्या मुलींकडे समाज कशा नजरेने पहात असतो? हे कधी थांबणार? मुली कधी मोकळा श्वास घेणार? कधी सुरक्षित होणार? का हे असेच चालू राहणार? मलाही दोन मुली आहेत. ज्या वेळेस माझ्या मुलींच्या वयाच्या मुलींवर हे अत्याचार होतात तेव्हा मला माझ्या मुलीच समोर दिसतात. असा प्रसंग माझ्याच काय पण जगातल्या कुठल्याही मुलीवर वा महिलेवर येऊ नये.

**सुरेखा शेटे**
मंथन गट, नवलाख उंबरे

# दिशाच्या प्रकाशज्योती

दिशा संस्थेचे मावळ भागात अनेक महिला बचत-गट आहेत, महिलांची पतसंस्था आहे. नुकतीच पतसंस्थेची वार्षिक सभा झाली. त्यामध्ये आपल्या कार्याने समाजात प्रकाशज्योती लावणाऱ्या पण प्रसिद्ध नसणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला.

पहिली प्रकाशज्योती म्हणजे रमाबाई महिला बचतगट. आजच्या स्पर्धायुक्त काळात पुढे जायचेय. रोज नवीन स्पर्धा व रोज नवीन अडचणी. परंतु ह्या महिलांनी दिशाची साथ धरली. पंचायतराज प्रशिक्षणातून त्या आपल्या हक्कांविषयी जागृत झाल्या. त्यांच्या या जागृत होण्याचे प्रतीक म्हणजे त्यांनी पुढाकार घेऊन शासकीय अनुदानातून बांधून घेतलेला सिमेंटचा रस्ता.

समाजाच्या मुख्य प्रवाहातून जात असताना वेगळे वळण घेऊन पुढे जाणारी दुसरी प्रकाशज्योती म्हणजे नसरिन शेख. त्यांनी आपल्या उच्चशिक्षित मुलीच्या आंतरधर्मीय विवाहाला पाठिंबा दिला. शेख ताईंना त्यांच्या या निर्णयाने अनेक अडचणींना सामोरे जावे लागले तरीही न डगमगता त्यांनी आपल्या मुलीस पाठिंबा दिला.

बचतगट म्हटले की गटामध्ये प्रत्येकास स्वयंशिस्त असणे ही अतिशय आवश्यक गोष्ट आहे. संगीताताईं घोजगेंनी स्वयंशिस्त, प्रामाणिकता, नेतृत्व, निर्णयक्षमता या गुणांनी प्रत्येक सभासदाशी मैत्रीपूर्ण नाते प्रस्थापित करून पतसंस्थेतील एक आदर्श गट म्हणून आपल्या बचत-गटाचा लौकिक मिळवला. प्रत्येक सभासद प्रत्येक नियम काटेकोरपणे पाळताना दिसते. ह्या शिस्तपूर्ण वातावरणाच्या निर्मितीच्या शिलेदार आहेत संगीताताई.

दिशाच्या साथीने व मार्गदर्शनाने उद्योजिका म्हणून कमल मातवंडकर तयार झाल्या. पतीच्या निधनानंतर संसाराचा डोलारा स्वतःच्या खांद्यांवर घेत त्यांनी फरसाण, मेणबत्ती व भोजनालय या छोट्या घरगुती उद्योगांस सुरुवात केली. आज त्या चांगल्या प्रकारे व्यवसाय करत आहेत. अशा ह्या वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रकाशज्योतींची वाटचाल अशीच प्रकाशमय होओ, त्यातून अनेकींना प्रेरणा मिळो, यासाठी शुभेच्छा !

**शीतल जाधव**

दिशा, तळेगाव दाभाडे

# ॲनिमिया नको ग बाई

आमच्या गावात महिलांची हिमोग्लोबीन तपासणी आयोजित केली होती. त्यावेळी माझ्या रक्तातील हिमोग्लोबीनची तपासणी झाली. माझे हिमोग्लोबीन ९.११ इतके होते. डॉक्टरांनी पुन्हा एकदा हिमोग्लोबीनचा रिपोर्ट पाहिला आणि म्हणाले, ''हे प्रमाण कमी आहे. स्त्रियांच्या रक्तातील हिमोग्लोबीन हे किमान १२ च्या तरी पुढे पाहिजे.'' मी इतर महिलांची हिमोग्लोबीन तपासणी होईपर्यंत बसून होते. मनात विचार चालू होते की आपले हिमोग्लोबीन कमी कसे? मला काही आजार तर नाही ना? ते वाढवायचे तर कसे? शेवटी मी डॉक्टरांना मनातील सर्व शंका विचारायचे ठरवले. डॉक्टर नेमके काय सांगतील याविषयी मनात थोडी भीती, शंका होती. पण मनातील भीती व शंका बाजूला सारून मी डॉक्टरांना विचारले, ''असे हिमोग्लोबीन कमी का असते? इतरांचे पण असू शकते का? मला काही आजार तर नाही ना? ते आपण वाढवू शकतो का?''

डॉक्टरांनी सर्व ऐकले आणि त्यांनी प्रश्नांची उत्तरे तर दिलीच पण माझ्या मनातून शंकाही पळवून लावली. त्यांनी एक महिना गोळ्यांचा कोर्स करण्यास सांगितला. दिशा संस्थेची कार्यकर्ती राजश्री जाधव यांनी माझ्याकडे लोहाच्या गोळ्या घरी आणून दिल्या. सर्व माहिती सांगितली, ''गोळ्या चुकवू नका, यासोबत, पालेभाज्या, मोडाची कडधान्ये, फळे, चिक्की हे पदार्थ

खा.'' मी सर्व पदार्थ व गोळ्या नियमित घेतल्या. मी घराजवळ परसबाग तयार केली आहे. त्यामध्ये अळू, कढीपत्ता, शेवगा, लिंबू, आवळा लावला आहे. पूर्वी मी घरात असलेल्या कडधान्याची आमटी करायचे. पण आता मोड आणून त्याची उसळ करते. तर कधी मोड आलेल्या कडधान्याची भेळ करते. आता मी तेलाचा वापरही कमी केलेला आहे. सुरवातीला हे जड गेले पण तरीही निश्चयपूर्वक मी हा बदल घडवून आणला आहे. आणि त्याचे फळही मला मिळाले. दिशा संस्थेने काही महिन्यात पुन्हा आमच्याच गावात आरोग्य-शिबिर घेतले; तेव्हा माझे हिमोग्लोबीन १३.१ झाले होते. मला खूप आनंद झाला.

आपणच आपल्या आरोग्याविषयी जागृत राहिले पाहिजे हे तर पटलेच पण मी आता इतरांनाही हेच सांगते. दिशा संस्थेने संक्रांतीकार्यक्रमानिमित्त आमच्या गावातील महिलांना लोखंडी कढईचे वाटप केले. त्यातच जेवण बनविण्याचा सल्ला दिला. मी न विसरता, न चुकता त्या लोखंडी कढईतच भाजी बनवते. माझा थकवा आता पूर्ण गेला आहे. साधे छोटे-छोटे आजारही माझ्याकडे पाहत नाहीत. पूर्ण क्षमतेने मी घरकाम व शेतीची कामे करू शकते.

**वंदना कुटे**

बुधवडी

# हे चित्र कधी बदलणार?

**२० ऑगस्ट हा डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचा स्मृतीदिन. साडेतीन वर्षांपूर्वी डॉ. दाभोळकरांची हत्या करण्यात आली. अजूनही त्यांच्या मारेकऱ्यांना पकडण्यात सरकारला यश आलेले नाही. आणि दुसऱ्या बाजूला बुवाबाजीचे प्रकार वाढताहेत. राम रहीम प्रकरण तर तेव्हा चांगलेच तापले होते. या पार्श्वभूमीवर संवादिनीच्या मासिक सत्रात 'प्रश्न तुमचे, उत्तरे डॉ. दाभोळकरांची' ही सीडी दाखवली. सप्टेंबर महिन्यातील सत्रात सुरवातीला त्याचाच आढावा घेण्यात आला. त्यातील कोणते विचार पटले, कोणते नाहीत, त्याविषयी काय विचार केला इत्यादीबद्दल बोलणे झाले. त्यामध्ये काहींनी अंगात येण्याविषयी, काहीनी वास्तुशास्त्राबद्दलचे, तर काहींनी मासिक पाळीत पाळल्या जाणाऱ्या प्रथांबद्दलचे स्वत:चे अनुभव सांगितले. त्यापैकीच संतोष यांना आलेला हा अनुभव त्यांच्याच शब्दांत...**

'मी कामावरून रात्री ८-८. ३० वाजता घरी गेलो. आमच्या घराच्या दारातच माझ्या समोर राहणारी महिला झोपली होती. विचारल्यावर असे समजले की, 'नवरात्रीच्या निमित्त घराची स्वच्छता सुरू आहे. दारात झोपलेल्या ताईंना मासिक पाळी आहे म्हणून त्या आपल्या दारात झोपणार आहेत.' हे ऐकून असंख्य वेदना झाल्यासारखे वाटले. मला रहावले नाही. मी त्यांना म्हणालो, 'ताई, मी तुमच्या भावनांचा आदर करतो. परंतु ज्यासाठी स्वच्छता करता आहात ती देवी म्हणजे एक स्त्री आहे. (देवी मानणे हा वेगळाच मुद्दा) म्हणजे देवीच्या आयुष्यात तुमच्या सारखी मासिक पाळी आलीच असेल ना. याही पलीकडे म्हणजे या मासिक पाळीचा आणि नवरात्र उत्सवातील स्वच्छतेचा काही संबध आहे का याबद्दल कधी विचार केलाय का?'

एकही शब्द न बोलता निमूटपणे त्या ताई माझे बोलणे ऐकत होत्या. मनात असा विचार करत असतील की चुकले यांच्या दारात झोपले. त्यांच्या मोठ्या मुलीने हे सर्व ऐकल्यावर आईला म्हटले, ''आई ये इकडे. सर्व स्वच्छता झालीये. घराच्या बाहेर झोप.'' विषय इथेच संपला असे वाटले. परंतु नाही. नवरात्रीच्या काळात त्या मुलीला मासिक पाळी सुरू झाली. त्या काळात आईने तिला समोर दारात खुर्चीवरच बसवले.

**संतोष वंजारी**

दिशा, तळेगाव दाभाडे

# शासन आणि समुदाय यांच्यातला पूल : ‘सहाय्य एक खिडकी केंद्र’

सेंटर फॉर ॲडव्होकसी अँड रिसर्च (सीफार) ही संस्था आठ राज्यांमध्ये काम करत आहे. वंचित महिलांना विविध शासकीय योजना मिळाव्यात यासाठी सीफारने सुरवातीला सोलापूर जिल्हामध्ये प्रकल्प राबवला. या अनुभवाच्या आधारे सीफार संस्थेमार्फत पुणे, बंगळूरू, अजमेर आणि भुवनेश्वर या शहरांमध्ये काम सुरू केले. असंघटित क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या गरीब व वंचित महिलांना आणि मुलींना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा व सरकार आणि समुदाय यांच्यामध्ये एक पूल तयार व्हावा यासाठी हे काम आहे. पुण्यामध्ये हा प्रकल्प महानगरपालिका, महिला आणि बाल विकास विभाग व पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या सहकार्याने सात गरीब वस्त्यांमध्ये राबविण्यात येत आहे. ‘सहाय्य एक खिडकी केंद्र’ असे या कार्यक्रमाचे नाव आहे.

शहरी भागातील वंचित समुदाय हा रोजगाराच्या शोधात गुंतलेला असतो, त्यामुळे ह्या समुदायाला एकत्र आणणे हे प्रकल्पाच्या सुरुवातीच्या काळामध्ये एक मोठे आव्हान होते. प्रकल्पाच्या सुरुवातीला पुण्यातील सात गरीब वस्त्यांतील २४ महिलांनी एकत्रित मिळून प्राथमिक गरजांचा अभ्यास केला. एकूण २८० महिलांची माहिती घेतली. ह्यामध्ये असे निदर्शनास आले की, २८० पैकी १४% महिलांकडे आधारकार्ड नव्हते, ८% महिलांकडे रेशनकार्ड नव्हते व ११% महिलांकडे मतदान-कार्ड नव्हते. योजनांमध्ये अन्न सुरक्षा योजना, झोपडपट्टी पुनर्वसन योजना, संजय गांधी निराधार योजना (पेन्शन योजना), वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी अनुदान, आणि गंभीर आजारासाठी आर्थिक मदत असा त्यांचा प्राधान्यक्रम होता.

वेगवेगळ्या कारणांमुळे शासकीय योजना ह्या महिलांपर्यंत पोचत नाहीत, शासनाच्या विरोधात जाऊन काम करण्यापेक्षा शासनाच्या बरोबर काम केले तर अनेक योजनांचा लाभ या



महिलांना मिळेल असे वाटले आणि याच धर्तीवर एक कार्यक्रम आखला. सुरुवातीच्या काळात सरकारी अधिकारी मान्य करत नव्हते की, शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोचत नाहीत. समुदायातील महिला व सरकारी अधिकारी यांच्या समवेत योजनांचे त्रिमाही मूल्यांकन, समुदायातर्फे योजनांचे रिपोर्ट कार्ड या माध्यमांतून रिपोर्ट सादर केल्यानंतर सरकारी विभागाकडून सहकार्य मिळाले. खरेतर सरकारचा उद्देश पूर्ण व्हायला आमच्या महिला मदतच करत आहेत.

‘सहाय्य एक खिडकी केंद्र’ या केंद्राची अधिकृत मालकी या महिलांची असेल, यामध्ये एकूण ८४ महिला मॅसेंजर म्हणून त्यांच्या वस्त्यांमध्ये काम करतील व हा कार्यक्रम पुढे घेऊन जातील. दहा हजारपेक्षा जास्त लोकांपर्यंत आम्ही आत्तापर्यंत एक खिडकीच्या माध्यमातून पोचलो आहोत.

**तृष्णा कांबळे**
सीफार, पुणे

# अखेर काम झाले

सर्वे. नं.११२ ब, विश्रांतवाडी येथे अंदाजे २००० लोकसंख्या आहे, पण सर्व वस्तीसाठी एकच सार्वजनिक शौचालय आहे. या शौचालयाचा वापर अर्धी वस्ती करते आणि याबदल्यात प्रत्येक कुटुंबातून रु. ४० दिले जातात, पण तरीही शौचालय रोज साफ होत नव्हते, बरेच सीट तुटलेले होते. त्यामुळे लोकांना खूप त्रास होत होता. दिनांक २२ जून २०१६ रोजी स्थानिक महिला, सीफार संस्था, आरोग्य विभाग आणि येरवडा क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी यांची आमच्या वस्तीमध्ये मिटिंग झाली. या मिटिंगनंतर सार्वजनिक शौचालयाची स्वच्छता नियमित होऊ लागली. ही आमचीही जबाबदारी आहे हे समजून आम्ही 'पब्लिक मॅनेजमेंट कमिटी' स्थापन केली. या कमिटीमध्ये एकूण १५ महिला आहेत त्या वस्तीमधील स्वच्छतेसंबंधी कामे करतील असे ठरवले. परंतु, सार्वजनिक शौचालयाची गळणारी पाण्याची टाकी, तुटलेल्या सीटस याकडे अधिकारी दुर्लक्ष करत होते. त्यामुळे आम्ही 'सहाय्य एक खिडकी केंद्रा'च्या माध्यमातून ऑनलाईन तक्रारी नोंदवल्या. फोन व मॅसेजद्वारे पाठपुरावा केला, पण त्यांनी तात्पुरती डागडुगीची कामे केली. अनेकवेळा पाठपुरावा केल्यानंतर दिनांक १९ सप्टेंबर २०१७ रोजी येरवडा क्षेत्रीय कार्यालयामधील आरोग्य निरीक्षक पाहणी करायला आले व त्यांनी सार्वजनिक शौचालयाची फुटलेली पाईप लाईन व तुटलेले सीट बदलून दिले. हे बदल होण्यासाठी एक वर्षाचा काळ लागला. वस्तीतील आरोग्याच्या इतर समस्या सोडविण्यासाठी आमचे प्रयत्न अजूनही चालू आहेत आणि आमच्या सहाय्य एक खिडकीच्या व समितीच्या माध्यमातून हे लवकर शक्य होईल असा विश्वासही आहे.

**कांता धेंडे**
विश्रांतवाडी, पुणे

# एक स्फूर्तीदायी अनुभव

सीफार संस्थेच्या मदतीने आमच्या वस्तीत 'सहाय्य एक खिडकी केंद्र'चे काम चालू आहे. गेल्या दीड वर्षापासून मी कार्यकर्ती म्हणून काम करत आहे, ह्या दीड वर्षात मी खूप शिकले. आम्ही वस्तीमधील महिला एक विषय घेऊन त्याचा अभ्यास करतो, त्यासाठी वस्तीमध्ये फॉर्म भरतो आणि तो अभ्यास अधिकाऱ्यांसमोर मांडतो. उदा. रेशनच्या समस्या, आरोग्याच्या समस्या, बँकेची समस्या इ. हा अभ्यास करताना खूप लोक अशी भेटतात की ज्यांना ह्या योजनेचा लाभ मिळाला पाहिजे असे वाटते पण त्यांच्याकडे कागदपत्रे नसल्यामुळे त्यांना तो मिळत नाही. त्यावेळेस खूप वाईट वाटते. अशा वेळेस आम्ही त्या विभागाच्या अधिकाऱ्यांना भेटतो आणि त्या व्यक्तींना लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न करतो. हे काम करत असताना अधिकारी लोकांशी कसे बोलावे, पत्रकारांशी कसे बोलावे हे समजले.

आम्ही जसे काम करतो तसेच काम सीफार बंगळुरू येथेही करते. ते बघण्यासाठी आम्ही सात महिला बंगळुरूला गेलो होतो. आम्ही वस्तीमधील महिला, आशा वर्कर आणि महिला आरोग्य समितीच्या महिलांना भेटलो. ह्या सर्व महिला मिळून वस्तीमधील समस्या सोडवितात. ह्या महिला अंगणवाडीबरोबर मिळून गरोदर महिला, लहान मुले, कुपोषित

मुले यांच्यासाठी काम करतात. येथे एकूण ४४ महिला आरोग्य समित्या आहेत, प्रत्येक शुक्रवारी ह्या महिलांची मिटिंग होते आणि त्या मिटिंगमध्ये वस्तीमधील समस्या, अडचणींवर चर्चा केली जाते, आणि चर्चेनुसार त्या वस्तीमधील समस्या सोडवतात. ह्या महिला संजय गांधी योजना, आरोग्यविषयीच्या योजना, मिशन इंद्रधनुष योजना, मातृत्व योजना अशा अनेक योजनांवर काम करतात. हे बघून खूप आनंद झाला. महिला आरोग्य समितीमार्फत असे काम आपण पुण्यामध्ये करूयात असा निश्चय केला.

या मिटींगमध्ये आम्ही मागरिटला भेटलो. ती खूप बोलत होती, वस्तीमधील सर्व माहिती तिला होती. हिला इतके कसे माहिती आहे असा प्रश्न मला पडला. तिच्याशी बोलायची खूप इच्छा झाली म्हणून तिच्याशी बोलले, तेव्हा असे समजले की, मागरिट ही आमच्यासारख्या वस्तीमध्येच राहते. तिने २० वर्षांपूर्वीची घटना आम्हाला सांगितली. ''माझ्या बहिणीला दिवस गेले होते, पण आमच्या वस्तीमध्ये आरोग्याच्या काहीच सुविधा नव्हत्या, माझ्या बहिणीला खूप त्रास होत होता. घरातील सर्वच लोक इकडे-तिकडे पळत होती, मदत मागत होती. सुविधा नसल्यामुळे माझ्या बहिणीचे बाळ वारले. तो दिवस माझ्यासाठी खूप वाईट होता. तेव्हाच ठरवले माझ्या बहिणीबरोबर जे झाले ते दुसऱ्याबरोबर होता कामा नये म्हणून वस्तीमध्ये काम करण्याचा निर्णय घेतला आणि लोकांसाठी काम करायचे असे ठरवले. तेव्हापासून मी कोणतेही पैसे न घेता माझ्या परिने लोकांना मदत करत गेले. आत्ता मी आशा वर्कर म्हणून मी आरोग्याच्या अनेक समस्यांवर काम करत आहे. आरोग्य-विषयक समस्यांसाठी अर्ज लिहून सरकारी विभागाकडे देते आणि तिथून काही काम झाले नाही तर मंत्रालयापर्यंत अर्जाचा पाठपुरावा करते.''

मागरिटशी बोलल्यानंतर, तिची सर्व कहाणी ऐकल्यावर मन भरून आले. आपल्या वस्तीमध्येही अशा बऱ्याच समस्या आहेत, आपणही आपल्या लोकांसाठी काम करावे असा आतून एक आवाज आला.

बंगळुरूच्या 'सहाय्य एक खिडकी'ला दिलेली ही भेट माझ्या आयुष्यातील कधी न विसरता येणारी घटना आहे. महिला आरोग्य समितीच्या माध्यमातून खूप छान काम चालू आहे, आपल्या महाराष्ट्रात अजून महिला आरोग्य समितीवर इतके काम झाले नाही. या अनुभवातून मला खूप काही शिकायला मिळाले. असे काम मला आमच्या पुण्याच्या 'सहाय्य एक खिडकी केंद्र' मध्ये करायचे आहे आणि त्यासाठी मी खूप प्रयत्न करेन.

**संगीता पिलावरे**
येरवडा, पुणे


**संपादक** : वंदना कुलकर्णी **संवादिनी गट :** प्राजक्ता उषा विनायक, अर्चना झेंडे, स्नेहल ठक्कर

**कार्यालयीन साहाय्य :** सुवर्णा जाधव, तनजिम खानजादे

**प्रकाशक** : आलोचना, ५, पंचाद्री सोसायटी, दुसरा मजला, अशोक पथ, लॉ कॉलेज रोड, पुणे ४११००४.
फोन : ०२०-२५४४४१२२

**मांडणी** : यदिश ग्राफिक्स, पुणे ३०. **मुद्रक :** मुद्रा, पुणे ३०

**संवादिनी प्रकल्पातील सहभागी संस्था :** साधना व्हिलेज, मुळशी; दिशा, तळेगाव दाभाडे; रचना, पानशेत; वर्क फॉर इक्वॅलिटी, तळेगाव दाभाडे; ऊर्मी, हिंजेवडी; मंथन गट; नवलाख उंबरे; ग्रीनतारा, विश्रांतवाडी; बहुजन हिताय, दापोडी; स्त्रीवाणी, होप, वडगाव शेरी; क्रांतिज्योती, येरवडा; बॉस्को सामाजिक संस्था, येरवडा; नारी समता मंच; रेनबो होम्स, पुणे.

फक्त खासगी वितरणासाठी; या अंकातील विचारांशी आलोचना सहमत असेलच असे नाही.